**<u>सी.एन.आर.नं. एमएचएसआय ०७—०००३५—२०१७</u>**

**<u>नि.दि.मु.क्र. १२/२०१७ मधील नि.क्र. २० वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा दावा नुकसानभरपाईसाठी व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने नि.क्र. १ वरील त्याच्याविरुध्द दावा कैफियतीशिवाय व तुर्तातुर्त ताकीद अर्ज त्याच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जातील त्याचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादीची पत्नी आजारी असल्यामुळे तसेच त्याला त्याच्या कौटुंबिक व आर्थिक अडचणीमुळे वेळच्यावेळी कामासंबंधीची कागदपत्रे घेवून विधीज्ञांना भेटून कैफियत व म्हणणे मुदतीत दाखल करता आले नाही. त्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द दि. १२/०६/२०१७ रोजी 'कैफियत व म्हणणे नाही' असा आदेश नि.क्र. १ वर पारीत करण्यात आलेला आहे. कैफियत दाखल न करण्यापाठीमागे त्याचा कोणताही हलगर्जीपणा अथवा बेफिकिरपणा नव्हता. सबब त्याची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेण्यात यावे. तसे न झाल्यास प्रस्तुत प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन प्रस्तुत प्रतिवादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून अर्जासोबत वैद्यकीय दाखला जोडण्यात आलेला नाही. प्रतिवादीची पत्नी केव्हापासून आजारी होती याबाबत पुरावा त्याने दिलेला नाही. अर्ज वेळाकाढूपणासाठी दाखल करण्यात आलेला आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनाम्याचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीने कैफियत मुदतीत दाखल न केल्याने दि. १२/०६/२०१७ रोजी त्याच्याविरुध्द नि.क्र. १ वर दावा त्याच्या कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा आदेश पारीत झालेला आहे. अर्जातील नमूद कारणे संयुक्तिक असल्याचे कोठेही दिसून येत नाही. तथापि, दाव्यातील वादीची मागणी लक्षात घेता, प्रतिवादीस कैफियत दाखल करण्याची संधी देणे न्यायोचित होईल. तथापि, प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास केलेला विलंब लक्षात घेता, त्याच्यावर रक्कम रु. ५००/– (रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीला देवू करुन अर्ज मंजूर करावा लागेल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज प्रतिवादीवर रक्कम रु. ५००/– (रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. १२/०६/२०१७ रोजीचा प्रतिवादीविरुध्द दावा कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादीने वादीला पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/–

दिनांक :–१६ जानेवारी, २०१८ (आर.आर.काळे)

ठिकाण :–मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.